




दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : २६३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.०५ मे २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# सुनेत्रा पवार यांचा रेकॉर्डब्रेक विजय; २०२९ ला बारामतीमध्ये पवार विरोधात पवार निवडणूक होणार?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, बारामती :** अजित पवार यांच्या निधनानंतर बारामती विधानसभा मतदारसंघाची जागा रिक्त झाली होती. या मतदारसंघात पाच राज्यातील विधानसभा निवडणुकांसोबतच पोटनिवडणूक पार पडली. अखेर आता या पोटनिवडणुकीचा निकाल हाती आला आहे. या पोटनिवडणुकीमध्ये महायुतीकडून सुनेत्रा पवार यांना उमेदवारी देण्यात आली होती. सुनेत्रा पवार या या निवडणुकीमध्ये प्रचंड मताधिक्याने निवडून आल्या आहेत, त्यांनी यापुर्वीचे सर्व रेकॉर्ड मोडले आहेत.

सुनेत्रा पवार या तब्बल २,१८,९३० एवढ्या प्रचंड मताधिक्याने बारामती विधानसभा मतदारसंघातून निवडून आल्या आहेत. दरम्यान सुनेत्रा पवार यांचा विजय झाल्यानंतर आता २०२९ मध्ये या मतदारसंघात उमेदवार कोण असणार? या मतदारसंघात पुन्हा एकदा पवारांविरोधात पवार निवडणूक होणार का? अशा चर्चेला उधाण आलं आहे. यावर बोलताना राष्ट्रवादीचे नेते उमेश पाटील यांनी मोठं विधान केलं आहे.

**नेमकं काय म्हणाले उमेश पाटील?**

बारामतीकरांनी सुनेत्रा वहिनींना देशात रेकॉर्ड ब्रेक विजय मिळवून दिला आहे. बारामतीकर त्यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी आहेत. ही निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी प्रयत्न झाला, मात्र काही नेत्यांनी अपक्ष उमेदवारांना माघार घेऊ नये यासाठी कॉल केला. त्यांना कोणी कॉल केला हे योग्यवेळी जाहीर करेल. २०२९ ला बारामतीचा उमेदवार कोण याबाबत कोणीही आत्ताच ठरवू शकत नाही, पार्लमेंटरी बोर्ड त्याबाबत निर्णय घेईल. २०२९ साठी आणखी तीन- साडेतीन वर्ष बाकी आहेत, त्यामुळे आत्ताच त्यावर चर्चा करणे योग्य ठरणार नाही. जरी कोणी म्हणाले पवार विरुद्ध पवार होणार, मात्र काहींनी असं देखील सांगितले की यापुढे बारामतीत पवार विरुद्ध पवार होणार नाही, असं यावेळी उमेश पाटील यांनी म्हटलं आहे.

**भाजपचा मोठा विजय !**

आज ५ राज्याच्या विधानसभा निवडणुकांची मतमोजणी सुरू आहे. आतापर्यंत हाती आलेल्या निकालानुसार पश्चिम बंगाल, आसाम आणि पुडुचेरीमध्ये भाजपने बहुमताकडे वाटचाल केली आहे. तर केरळमध्ये मात्र डाव्यांना मोठा धक्का बसला आहे. काँग्रेसने डाव्या पक्षांच्या एकमेव गडाला सुरूंग लावला आहे, केरळमध्ये काँग्रेसला बहुमत मिळताना दिसत आहे.

## दणदणीत विजयानंतर जनतेला दिला थेट शब्द, म्हणाल्या शेवटी...



बारामतीच्या विधानसभा पोटनिवडणुकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा दणदणीत विजय झाला आहे. या निवडणुकीत त्यांना सर्व सत्ताधारी तसेच विरोधी पक्षांनी पाठिंबा दिला होता. त्यामुळे त्यांचा या निवडणुकीत विजय जवळपास नश्चित होता. फक्त विजेता म्हणून त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा होण्याचीच वाट पाहिली जात होती.

दरम्यान, या निवडणुकीत विजय मिळवताच त्यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. त्यांनी बारामतीच्या मतदारांचे आभार मानले आहेत. तसेच त्यांनी महायुती आणि महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्ष, पाठिंबा दिलेले इतर सर्व मित्र पक्ष, विविध संस्था, संघटना यांचे आभार मानले आहेत.

**हा विजय माझ्यासाठी केवळ...**

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत मला भरघोस मतांनी विजयी केल्याबद्दल तमाम मायबाप बारामतीकरांचे मनःपूर्वक आभार. आपण दाखवलेला विश्वास, प्रेम आणि पाठिंबा माझ्यासाठी अत्यंत मोलाचा आहे, अशा भावना सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केल्या. तसेच, आदरणीय अजितदादांच्या पश्चात झालेली बारामतीची ही पहिलीच निवडणूक होती. त्यांच्या मार्गदर्शनाची आणि त्यांच्या उपस्थितीची उणीव आज प्रकर्षाने जाणवते; हा विजय माझ्यासाठी केवळ राजकीय यश नसून, आदरणीय दादांच्या कार्याला आणि त्यांच्या स्मृतींना दिलेली खरी आदरांजली आहे. अजितदादांनी महाराष्ट्रासाठी आणि बारामतीसाठी केलेले कार्य, त्यांची जनतेशी असलेली नाळ आणि विकासाची त्यांची दृष्टी आजही प्रत्येकाच्या मनात कायम आहे. त्यांचे विचार आणि संस्कारच मला पुढे जाण्याची ताकद देत आहेत. हा विजय म्हणजे त्यांच्या स्वप्नांना आणि त्यांच्या कार्याला पुढे नेण्याची जबाबदारी आहे, याची मला पूर्ण जाणीव आहे, असेही त्या म्हणाल्या.

**शिव-शाहू-फुले-आंबेडकर या महामानवांच्या विचारधारेचा वारसा**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व वरिष्ठ नेते, पदाधिकारी आणि सर्व कार्यकर्ते यांचे मनःपूर्वक आभार..! तुमच्या अथक परिश्रमामुळेच हा विजय शक्य झाला आहे. तसेच या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्ष, पाठिंबा दिलेले इतर सर्व मित्र पक्ष, विविध संस्था, संघटना यांचे मी मनःपूर्वक आभार मानते, असे म्हणत त्यांनी सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. सोबतच शिव-शाहू-फुले-आंबेडकर या महामानवांच्या विचारधारेचा वारसा जपत, आदरणीय यशवंतराव चव्हाण साहेब आणि आदरणीय अजितदादांनी दाखवलेल्या मार्गावर चालण्याचा माझा निर्धार कायम राहील.तरुणाई, शेतकरी, महिला, उद्योजक आणि समाजातील सर्वच घटकांना केंद्रस्थानी ठेवून बारामतीच्या विकासासाठी आपण सर्वजण एकत्रितपणे काम करूया, असे आवाहनही त्यांनी जनतेला केले.

**बारामतीकरांनी माझ्यावर ठेवलेला विश्वास...**

शेवटी निवडणुका येतात आणि जातात, पण बारामतीचा सलोखा आणि जिव्हाळा कायम राहिला पाहिजे. म्हणूनच कोणताही जल्लोष न करता आपण कामातूनच हा विजय साजरा करूया. बारामतीकरांनी माझ्यावर ठेवलेला विश्वास मी कधीही कमी पडू देणार नाही. आपल्या सर्वांच्या सुख-दुःखात सदैव खंबीरपणे उभी राहीन, अशी मी आपणांस खात्री देते, असे आश्वासनही लोकांना दिले.

# राहुरीत पवारांच्या राष्ट्रवादीवर मोठी नामुष्की; उमेदवाराचं डिपॉझिट जप्त

## अक्षय कर्डिलेंचा विक्रमी मताधिक्याने विजय !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, अहिल्यानगर :** राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपचे उमेदवार अक्षय कर्डिले यांनी १ लाख, १२ हजार ५८७ मताधिक्याने दणदणीत विजय मिळवला आहे. राहुरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे निधनानंतर ही पोट निवडणूक लागली होती. या निवडणुकीत शिवाजी कर्डिले यांचे पुत्र अक्षय कर्डिले यांना १ लाख ४० हजार ९३ मते तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार गोविंद मोकाटे यांना २७ हजार ५०६ मते मिळाली. मतमोजणीच्या सुरुवातीपासूनच अक्षय कर्डिले यांनी एकतर्फी आघाडी घेतली होती. प्रत्येक फेरीत वाढत गेलेली आघाडी पाहता निकालाची औपचारिक घोषणा होण्यापूर्वीच त्यांचा विजय निश्चित मानला जात होता. अखेरीस मोठ्या फरकाने त्यांनी पोटनिवडणुकीत बाजी मारत राहुरीतील राजकारणात भाजपचा झेंडा पुन्हा फडकवला आहे.

**तनपुरेंची माघार ठरला टर्निंग पॉइंट !**

राहुरी पोटनिवडणुकीत प्राजक्त तनपुरे यांनी घेतलेला माघारीचा निर्णय टर्निंग पॉइंट ठरला. सुरुवातीला तनपुरे निवडणूक लढवणार असल्याची जोरदार चर्चा होती.




मात्र अचानक भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी थेट तनपुरे यांच्या कार्यालयात जाऊन त्यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी निवडणूक न लढवायचा निर्णय घेतला आणि राजकीय समीकरणे झपाट्याने बदलली. या चर्चेनंतर तनपुरे यांनी राहुरीच्या विकासासाठी एक पाऊल मागे घेत आहे असे सांगत निवडणूक न लढवण्याचा निर्णय जाहीर केला.

**पवारांच्या राष्ट्रवादीकडून शेवटच्या क्षणी मोकाटेंना उमेदवारी**

तनपुरे यांच्या माघारीनंतर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासमोर उमेदवाराचा प्रश्न निर्माण झाला. शेवटच्या क्षणी पंचायत समितीचे माजी सदस्य गोविंद मोकाटे यांना उमेदवारी देण्यात आली. मात्र अचानक मिळालेल्या संधीमुळे त्यांना प्रभावी प्रचार यंत्रणा उभारता आला नाही आणि त्याचा परिणाम थेट निकालावर दिसून आला. त्यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव झाला.

दरम्यान, शिवाजी कर्डिले यांच्या निधनानंतर ही पोटनिवडणूक बिनविरोध होण्याच्या चर्चांना सुरुवातीला जोर होता. मात्र प्राजक्त तनपुरेंच्या माघारीनंतरही निवडणूक झाली आणि अखेर थेट लढतीत भाजपने बाजी मारली. या निकालामुळे राहुरीतील राजकीय समीकरणे बदलली असून भाजपने आपली ताकद पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे. एकंदरीत, तनपुरे यांच्या माघारीपासून ते शेवटच्या क्षणापर्यंत घडलेल्या राजकीय घडामोडींनी राहुरी पोटनिवडणूक अत्यंत नाट्यमय बनवली. मात्र शेवटी संघटनशक्ती, रणनीती आणि नेतृत्वाच्या जोरावर अक्षय कर्डिले यांनी दणदणीत विजय मिळवत भाजपचा झेंडा उंचावला. अक्षय कर्डिले यांनी आपले वडील दिवंगत शिवाजीराव कर्डिले यांच्यापेक्षाही जास्त मतांनी विजय मिळवला असून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार गोविंद मोकाटे यांचे डिपॉझिट जप्त होणार आहे.

# भद्रावतीत शिक्षकाची निर्घृण हत्या उघड, पत्नीनेच रचला पतीच्या खुनाचा कट



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०४, चंद्रपूर :** भद्रावती पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या घोडपेठ परिसरात हनुमान मंदिराजवळ संशयास्पद अवस्थेत आढळलेल्या मृतदेहाच्या प्रकरणाचा पोलिसांनी सखोल तपास करत धक्कादायक उलगडा केला आहे. जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकाचा खून त्याच्या पत्नीने सहकाऱ्यांच्या मदतीने कट रचून केल्याचे निष्पन्न झाले असून या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. २ मे २०२६ रोजी सकाळी सुमारे १०.३० वाजताच्या सुमारास घोडपेठ येथील कर्मवीर शाळेजवळ एका व्यक्तीचा मृतदेह आढळल्याची माहिती भद्रावती पोलीस ठाण्यास मिळाली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असता मृत व्यक्तीच्या गळ्याभोवती प्लास्टिक पिशवी व त्यावर पांढरा दुपट्टा घट्ट आवळलेला आढळून आला.

घटनास्थळी मिळालेल्या मोबाईल फोनच्या कॉल डिटेल्सच्या आधारे मृताची ओळख रविंद्र तुळशीराम कुळमेथे (वय ४६), रा. मुधोली चेक नं. २, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली अशी पटली. ते जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत होते. पोलिसांनी तत्काळ त्यांच्या पत्नी दिपमाला कुळमेथे हिला चौकशीसाठी बोलावले. मृतदेहाचे शवविच्छेदन ग्रामीण रुग्णालय, भद्रावती येथे करण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या प्राथमिक अहवालानुसार गळा आवळल्यामुळे मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. तपासादरम्यान पोलिसांनी मृताची पत्नी दिपमाला हिची सखोल चौकशी केली असता खळबळजनक माहिती समोर आली. पतीकडून होत असलेल्या कथित त्रासातून मुक्त होण्यासाठी दिपमालाने वर्षा परचाके हिच्यासोबत संगनमत करून पतीच्या खुनाचा कट रचल्याचे उघड झाले. नागपूर येथे उपचारादरम्यान दोघींची ओळख झाली होती. याच काळात दिपमालाने आपली व्यथा वर्षाला सांगितली असता, पतीचा खून केल्याशिवाय सुटका नाही, असा सल्ला वर्षाने दिल्याचे तपासात निष्पन्न झाले. पूर्वनियोजनानुसार २९ एप्रिल रोजी दिपमालाने पती रविंद्र यांना दिघोरी येथे नातेवाईकांच्या लग्नासाठी बोलावले. लग्नानंतर त्यांना परत जाऊ दिले नाही. ३० एप्रिल रोजी सकाळी दिघोरी बसस्थानकाजवळ सोनू उर्फ प्रविण कालोकर व नाझीर अंसारी कार घेऊन आले. दिपमालाने पतीला त्या कारमध्ये बसवून आरोपींच्या ताब्यात दिले. त्यानंतर आरोपींनी रविंद्र यांना घोडपेठ परिसरातील सुनसान ठिकाणी नेऊन कारमध्येच गळा आवळून त्यांची हत्या केली. १ मे रोजी काम झाले असा फोन दिपमालाला आल्याचेही तपासात समोर आले आहे. घटनास्थळ पंचनामा, कॉल डिटेल्स, पोस्टमार्टम अहवाल व आरोपींच्या कबुलीजबाबाच्या आधारे हा पूर्वनियोजित खून असल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी भद्रावती पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेने संयुक्त कारवाई करत आरोपी दिपमाला कुळमेथे व वर्षा परचाके यांना वरोरा येथून, तर सोनू उर्फ प्रविण कालोकर व नाझीर अंसारी यांना नागपूर येथून ताब्यात घेतले. आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली कार (क्र. एमएच ३१ डीसी ८९१९) तसेच मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत. चौकशीत आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी दिनकर ठोबरे यांच्या मार्गदर्शनाखाली भद्रावती पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक योगेश्वर पारधी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे स्थानिक गुन्हे शाख येथील सपोनि बलराम झाडोकार, पोउनि सवेश बेलसरे, पोउपनि संतोष निंभोरकर, पो. स्टे भद्रवती येथील स.पो.नि. विरेन्द्र केदारे, सपोनि संजय मिश्रा मपोउपनि प्रियका गेडाम, पो स्टे भद्रावती शोध पथकातील सफौ महेन्द्र बेसरकर, पो हवा. अनुप आस्टूनकर, जगदीश झाडे, विश्वनाथ चुदरी, धर्मराज मुंडे. पोअ योगेश घाटोळे, सतोष राठोर, प्रेमकुमार बावनकर, रोहित चिटगिरे, मपोज करिश्मा जुनघरी तसेच स्थानिक गुन्हे शाख चे पोहेका नितीन कुरेकार, नितीन साळवे, प्रमोद कोटनाके, किशोर वैरागडे पोअ. अमोल सावे, गोपीनाथ नरोटे, शेखर माथनकर, दिनेश अराडे, वृषभ बारसिंगे यांनी केली.

# कनेक्टिंग लिंकवर फोटोसाठी थांबल्यास होणार दंड !

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०४, मुंबई :** यशवंतराव चव्हाण मुंबई- पुणे द्रुतगती मार्गावरील कनेक्टिंग लिंक (मिसिंग लिंक) लोकार्पणानंतर वाहतुकीसाठी सुरू करण्यात आली आहे. मात्र प्रवासा दरम्यान सेल्फी, फोटो, घेण्यासाठी वाहन चालक केबल स्टेड ब्रिज व बोगद्याजवळ वाहने थांबवत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. द्रुतगती मार्गावर वाहने थांबवण्यास परवानगी नसून वाहनधारकांसाठी अपघाताचा धोका असल्याने ते टाळावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

महाराष्ट्र दिनी रोजी यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे मार्गावरील कनेक्टिंग लिंक अर्थात मिसिंग लिंकचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण झाले.

महामार्ग पोलिसांनी अधिसूचनेद्वारे मुंबई-पुणे कनेक्टिंग लिंक प्रकल्पासाठी वेग मर्यादा जाहीर केली आहे. तसेच बोगद्यात हलक्या मोटार वाहनांसाठी ताशी १०० किमी वेग मर्यादा आणि बस व प्रवासी वाहनांसाठी ताशी ८० किमी वेग निश्चित केला आहे. कनेक्टिंग लिंक प्रकल्पातील दोन बोगदे व दोन पुलावर पूर्णपणे २४७ सीसीटीव्ही यंत्रणेचे लक्ष आहे. यावर देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष असून द्रुतगती मार्गावर थांबणाऱ्या गाड्यांची माहिती महामार्ग पोलिसांना दिली जाणार आहे.



सेल्फी, फोटो आणि रिल काढण्यासाठी थांबू नका नाहीतर मोठ्या दंडाची आकारणी होऊ शकते. तसेच तुमच्यासह इतरांच्याही वाहनांना धोका होऊ शकतो. या कारणास्तव, नियमांचे पालन करा आणि सुरक्षित, सुखकर प्रवास करा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.




## वैंभव : भारतीय क्रिकेटचे भविष्य

आयपीएल म्हणजे रत्नांची खाण असे म्हंटले जाते कारण दरवर्षी आयपीएलमध्ये असे रत्न उदयास येते की ज्या रत्नाने संपूर्ण क्रिकेट विश्वच उजळून निघते. अशाच एका उगवत्या रत्नाने केवळ भारतीय क्रिकेटच नव्हे तर संपूर्ण क्रिकेट जगत उजळून निघाले आहे आणि हे क्रिकेट रत्न आहे अवघ्या १५ वर्षाचं आणि त्याचे नाव आहे वैभव सूर्यवंशी. सध्या आयपीएलमध्ये वैभव सूर्यवंशी या १५ वर्षाच्या मुलाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे अर्थात त्याने तसा कारनामाच करून दाखवला आहे. मूळचा बिहार राज्यातील असलेला वैभव सूर्यवंशी हा अवघ्या १५ वर्षाचा युवा खेळाडू आहे. मागील वर्षी ज्यावेळी राजस्थान रॉयल्स संघाने त्याच्यावर १ कोटी १० लाखांची बोली लावून त्याला आपल्या संघात घेतले त्याचवेळी त्याची चर्चा सुरू झाली. राजस्थान रॉयल्स संघाने या १४ वर्षाच्या मुलावर इतकी मोठी बोली का लावली असा प्रश्न क्रिकेट वर्तुळात विचारला गेला त्याचे उत्तर शोधण्यासाठी थोडे मागे जावे लागेल. वैभव सूर्यवंशीने १२ व्या वर्षीच बिहारकडून १९ वर्षाखालील संघातून विणू माकड चषक क्रिकेट स्पर्धेत भाग घेतला तिथे त्याने चांगली कामगिरी केल्याने त्याची निवड बिहारच्या रणजी संघात करण्यात आली. बिहार कडून रणजी खेळणारा तो सर्वात कमी वयाचा खेळाडू ठरला. १३ व्या वर्षी वैभवने विजय हजारे चषकात धावांचा रतीब घातला त्यामुळे त्याची भारताच्या १९ वर्षाखालील ब संघात निवड झाली. ४ संघाने भाग घेतलेल्या या स्पर्धेत त्याने ६ डावात १७७ धावा काढल्या. त्यात त्याने दोन अर्धशतके झळकावली त्यामुळे ऑस्ट्रेलिया विरुद्ध भारताच्या १९ वर्षाखालील मुख्य संघात त्याची निवड झाली. १९ वर्षाखालील कसोटीतील पदार्पणाच्या सामन्यात त्याने अवघ्या ५८ चेंडूत तडाखेबंद शतक झळकावले त्यावेळी त्याचे वय १३ वर्ष होते. १९ वर्षाखालील आशिया कप स्पर्धेत तर त्याने धुमाकुळ घातला. तिथे यूएई विरुद्ध त्याने ४६ चेंडूत ७६ धावा काढल्या तर उपान्त्य फेरीत श्रीलंकेविरुद्ध ३६ चेंडूत ६७ धावा काढल्या. या स्पर्धेपासून त्याची सर्वत्र चर्चा होऊ लागली. ही चर्चा राजस्थान रॉयल्स संघाच्या पदाधिकाऱ्यांना समजली. त्यांनी त्यांचा बॅटिंग कोच असलेल्या विक्रम राठोडला वैभव सूर्यवंशीची फलंदाजी पाहण्यास सांगितले. विक्रम राठोड यांनी वैभव सूर्यवंशीची फलंदाजी पाहिली आणि त्याला आपल्या संघात घेण्याचे निश्चित केले. त्यांचा मुख्य कोच असलेला राहुल द्रविड हा तर नवोदित खेळाडूंना संधी देण्यास प्रसिद्ध आहे. त्याने देखील वैभवची फलंदाजी पाहिली आणि त्याला संधी देण्याचे ठरवले आणि अशाप्रकारे त्याची राजस्थान रॉयल्स संघात एन्ट्री झाली. आयपीएल सुरू झाली पण सुरुवातीच्या काही सामन्यात वैभवला संधी मिळाली नाही. लखनौ संघाविरुद्ध राजस्थान रॉयल्सने त्याला पहिल्यांदा संधी दिली. वैभव याच संधीची वाट पाहत होता. त्याने या संधीचे सोने करण्याचे ठरवले आणि त्याने पहिल्याच चेंडूवर शार्दुल ठाकूर सारख्या अनुभवी गोलंदाजाला पुढे सरसावत षटकार खेचला आणि सर्वांना चकित केले. या सामन्यात त्याने २० चेंडूत ३४ धावा काढून आपल्या आयपीएल कारकिर्दीची धडाकेबाज सुरुवात केली. दुसऱ्या सामन्यातही त्याने चांगली कामगिरी केली. गुजरात विरुद्धच्या सामन्यात तर त्याने कमाल करत अवघ्या ३८ चेंडूत १०१ धावा काढत क्रिकेट विश्वाला चकित केले. या शतकासोबत त्याने अनेक विक्रमाला गवसणी घातली. तो आयपीएल स्पर्धेत सर्वात कमी वयाचा शतकवीर ठरला. इतकेच नाही तर सर्वात कमी चेंडूत शतक झळकावणारा भारतीय खेळाडू ठरला. केवळ आयपीएलच नाही तर टी २० क्रिकेट इतिहासात सर्वात कमी चेंडूत शतक झळकावणारा सर्वात कमी वयाचा खेळाडू ठरला. त्याने अवघ्या ३६ चेंडूत शतक झळकावत युसुफ पठाणचा विक्रम मोडला. एका सामन्यात सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रमही त्याने आपल्या नावे केला. मागील वर्षी आयपीएल गाजवलेल्या वैभवने यावर्षी तर कमाल करत अनेक विक्रम आपल्या नावे केले. यावर्षीही त्याने ३६ चेंडूत शतक झळकावत इतिहास घडवला. आयपीएलमध्ये दोन शतके आणि दोन्हीही ३६ चेंडूत झळकावणारा तो एकमेव खेळाडू ठरला. वयाच्या १५ वर्षी आयपीएलमध्ये दोन शतके झळकावणाराही तो एकमेव खेळाडू आहे. केवळ आयपीएलमध्येच नाही तर मागील वर्षी झालेल्या १९ वर्षाखालील टी २० स्पर्धेतही त्याने शानदार कामगिरी केली. त्यांच्या शानदार कामगिरीने भारताने तो विश्वचषक आपल्या नावावर केला होता. आयपीएल असो की राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय क्रिकेट कोणत्याही स्पर्धेत तो जितक्या निर्भीडपणे खेळतो तितक्या निर्भीडपणे खेळणारे खूप कमी खेळाडू क्रिकेट विश्वात आहे. जसप्रीत बुमरा, ट्रेंट बोल्ट, रशीद खान, जोश हेजलवूड, मिचेल स्टार्क, पॅट कमिन्स यासारख्या जगातील दिग्गज गोलंदाजांना तो ज्या प्रकारे षटकार खेचतो ते पाहून अचंबित होते. अवघ्या १५ वर्षाच्या या खेळाडूच्या प्रेमात अवघे क्रिकेट विश्व पडले आहे. सचिन तेंडुलकर, राहुल द्रविड, पॅट कमिन्स, ॲडम गिलख्रिस्ट, वासिम अक्रम, सुनील गावसकर, श्रीकांत, अनिल कुंबळे, हरभजन सिंग, नवज्योत सिंग सिद्धू, हरभजन सिंग, महेंद्र सिंग धोनी यासारख्या महान खेळाडूंनी त्याचे कौतुक केले आहे. क्रिकेटचा देव सचिन तेंडूलकर तर त्याच्या प्रेमातच पडला आहे. सचिन तेंडूलकरने वैभवच्या खेळाविषयी ट्विट केले की, वैभवची निडर शैली, उत्कृष्ट बॅट स्पीड, चेंडूची लांबी पटकन ओळखण्याची क्षमता आणि चेंडूच्या मागे ताकद लावण्याची तयारी या सर्वांचा संगम म्हणजे वैभवची धमाकेदार खेळी. केवळ सचिन तेंडुलकरच नव्हे तर जगातील अनेक दिग्गज खेळाडूंनी त्याच्या कौतुकाचे इमले बांधले आहेत. केवळ खेळाडूच नव्हे तर क्रिकेट प्रेमीनींही त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. क्रिकेट प्रेमींनी त्याच्या खेळीचे व्हिडिओ, फोटो सोशल मीडियावर पोस्ट करत त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. मिडिया तर त्याच्यावर फिदाच झाली आहे. त्याच्या खेळाने त्याने आपण भारतीय क्रिकेटचे भविष्य आहोत हे दाखवून दिले आहे. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात या म्हणीप्रमाणे त्याने लहान वयातच आपण कोण होणार हे दाखवून दिले आहे. त्याच्या या लाजवाब फलंदाजीने त्याच्यावर प्रसिद्धीचा झोत आला आहे. वैभवने मात्र या झगमगाटाकडे दुर्लक्ष करून खेळावर लक्ष केंद्रित करायला हवे. त्याला आणखी यशोशिखरे गाठायची असेल तर त्याने झगमगाटापासून दूर राहिलेलेच बरे. प्रसिद्धीच्या झगमगाटात वाहत जाऊन आपल्या करिअरचे मातेरे करणारे अनेक खेळाडू आपण पाहिले आहेत. विनोद कांबळी, पृथ्वी शॉ ही त्याची बोलकी उदाहरणे आहेत. वैभवने आपल्या खेळावर लक्ष केंद्रित करून आणखी मेहनत केल्यास तो भारतीय क्रिकेटचे भविष्य ठरेल यात शंका नाही. वैभवला खूप खूप शुभेच्छा!

# महाराष्ट्र अत्याचाराच्या छायेत



'संतांची भूमी' आणि 'पुरोगामी विचारांचे माहेरघर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्राची प्रतिमा सध्या काहीशी काळवंडू लागली आहे. गेल्या काही महिन्यांत राज्याच्या विविध भागांतून समोर येणाऱ्या महिला, बालके आणि शोषितांवरील अत्याचारांच्या घटनांनी संपूर्ण समाजमन सुन्न झाले आहे. सुरक्षिततेच्या दाव्यांना छेद देणाऱ्या या घटनांमुळे आता विचार करण्याची वेळ आली आहे की, आपला महाराष्ट्र खरोखरच सुरक्षित आहे का ? घटनेचे गांभीर्य आणि वाढती गुन्हेगारीच्या संदर्भात बदलापूर असो, पुणे, मालेगाव असो किंवा ग्रामीण भागातील दुर्गम गावे असोत, अत्याचाराचे लोण सर्वत्र पसरताना दिसत आहे. केवळ शारीरिक अत्याचारच नव्हे, तर मानसिक छळ आणि सायबर क्राईमच्या माध्यमातून होणारी फसवणूकही चिंतेचा विषय ठरत आहे.

महाराष्ट्रात अलीकडच्या काळात काही अत्यंत दुर्दैवी आणि संतापजनक घटना घडल्या आहेत, विशेषतः पुण्यातील नसरापूर आणि चाकण परिसरातील घटनांमुळे संपूर्ण राज्य हादरले आहे. आपण २१ व्या शतकात वावरत असताना, विज्ञानाने प्रगती केली असली तरी सामाजिक सुरक्षिततेच्या पातळीवर आपण अजूनही मागे आहोत का, असा प्रश्न पडतो. दररोज वर्तमानपत्र उघडले की महिला आणि लहान मुलींवर होणाऱ्या अत्याचारांच्या बातम्या मन सुन्न करतात. सद्यस्थिती आणि वाढत्या घटना मुळे आजच्या काळात अल्पवयीन मुलींना घर, शाळा किंवा सार्वजनिक ठिकाणीही सुरक्षित वाटत नाही. मुंबई, पुणे, मालेगाव, आणि छत्रपती संभाजीनगर, अमरावती, जालना, सारख्या अनेक शहरांमधून मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचारांच्या घटना वारंवार समोर येत आहेत. अनेकदा अत्याचार करणारे व्यक्ती पीडितेच्या ओळखीचे किंवा नात्यातीलच असल्याचे समोर आले आहे, जे समाजाच्या नैतिक अधःपाताचे लक्षण आहे.

पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे १ मे (महाराष्ट्र दिन) च्या सुमारास एका ४ वर्षीय चिमुरडीवर ६५ वर्षीय नराधमाने लैंगिक अत्याचार करून तिची दगडाने ठेचून हत्या केली. या घटनेनंतर आरोपीने तिचा मृतदेह लपवण्याचाही प्रयत्न केला होता. स्थानिक ग्रामस्थांनी या घटनेचा तीव्र निषेध करत आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली असून संपूर्ण नसरापूर कडकडीत बंद ठेवण्यात आले होते.

नसरापूरची घटना ताजी असतानाच, चाकण परिसरातील महाळुंगे येथे एका ३ वर्षाच्या मुलावर अनैसर्गिक अत्याचार करून त्याची हत्या केल्याची दुसरी धक्कादायक घटना समोर आली आहे. आरोपीने मुलाचा मृतदेह एका सुटकेसमध्ये भरून तो निर्जनस्थळी फेकून दिला होता.

बदलापूर प्रकरणात एका शाळेतील दोन अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेमुळे संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली होती. मालेगावमध्ये ३ वर्षाच्या मुलीवर आणि पुण्यात ४ वर्षाच्या चिमुरडीवर झालेल्या अत्याचाराच्या घटनांनी महाराष्ट्र हादरला आहे. एप्रिल २०२६ मध्ये एका १९ वर्षीय तरुणाने १८० हून अधिक अल्पवयीन मुला-मुलींचे शोषण केल्याचा धक्कादायक प्रकारही समोर आला आहे. नाशिकमध्ये एप्रिल २०२६ मध्ये एका नामांकित बहुराष्ट्रीय आयटी कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांवर झालेल्या लैंगिक आणि मानसिक अत्याचाराचे खळबळजनक प्रकरण समोर आले आहे. या प्रकरणाच्या सखोल तपासासाठी विशेष तपास पथकाची (SIT) नियुक्ती करण्यात आली आहे.या प्रकरणात आतापर्यंत एकूण ९ गुन्हे (FIR) दाखल झाले असून, त्यात ८ महिला आणि १ पुरुष पीडित आहेत.पीडित महिलांनी लैंगिक छळ, विनयभंग आणि मानसिक छळाचे गंभीर आरोप केले आहेत. यासोबतच त्यांना धर्मांतरासाठी प्रवृत्त करणे, विशिष्ट धार्मिक पद्धतींचे पालन करण्यास भाग पाडणे आणि धार्मिक भावना दुखावल्याचे आरोपही आहेत. पोलिसांनी या प्रकरणात कंपनीचे काही टीम लीडर्स आणि पुण्यातील एका महिला एचआर व्यवस्थापिकेसह एकूण ७ संशयितांना अटक केली आहे.

स्वयंघोषित महाराज अशोक खरात प्रकरण मार्च २०२६ मध्ये नाशिकमध्ये ६७ वर्षीय स्वयंघोषित महाराज अशोक खरात याला २७ वर्षीय महिलेवर बलात्कार केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे.या प्रकरणाचा तपासही डखढ कडे सोपवण्यात आला असून, त्यात नरबळी आणि जादूटोण्यासारखे गंभीर पैलू असल्याचे संशय व्यक्त करण्यात आला आहे.या प्रकरणांचा तपास सध्या प्रगतीपथावर आहे.

नऊ वर्षाच्या मुली समोर अश्लील चाळे करताना

सहाय्यक पोलीस उपायुक्ताला अटक केल्याची घटना मुंबईत घडली ती वाचण्यात आली. वरळी परिसरात ही घटना घडली.रक्षकच झाला भक्षक असे म्हणावे लागतेय.

**महत्त्वाचे कायदेशीर आणि सामाजिक पैलू :**

**शक्ती कायदा** (Shakti Act) : अशा क्रूर गुन्ह्यांसाठी कठोर शिक्षेची तरतूद असलेला 'शक्ती कायदा' महाराष्ट्रात लवकरात लवकर लागू करावा, अशी मागणी पुन्हा एकदा जोर धरत आहे.

या दोन्ही घटनांमधील आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, तपास सुरू आहे. आरोपींना जलदगती न्यायालयात (Fast Track Court) खटला चालवून कठोर शासन करण्याची मागणी केली जात आहे.

या घटनांमुळे महिला आणि बालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

राज्याच्या गुन्हे अन्वेषण विभागाच्या (NCRB) आकडेवारीनुसार, महिलांवरील अत्याचाराच्या तक्रारींमध्ये वाढ झाली आहे. यातही सर्वात भयावह बाब म्हणजे, अल्पवयीन मुलींवर होणारे अत्याचार आणि त्यांची वाढती संख्या भयानक आहे.कायद्याचा धाक उरला आहे का?' शक्ती' कायद्यासारखे कडक कायदे कागदावर आले असले, तरी त्यांची अंमलबजावणी किती प्रभावीपणे होते, हा प्रश्न अनुत्तरितच आहे. पोलिसांवरील कामाचा ताण, तपास यंत्रणांमधील उणिवा आणि न्यायालयीन प्रक्रियेत होणारा विलंब यामुळे गुन्हेगारांचे धाडस वाढत असल्याचे चित्र दिसत आहे.

पोलसामधील नितीमत्ता कमी होताना दिसत आहे.

अकोला.. आरोपी महिलेकडे शरीर सुखाची मागणी, अल्पवयीन मुलीसमोर अश्लील चाळे, वरळी परिसरातील घटना. या घटनावरून ते स्पष्ट दिसून येत आहे. जोपर्यंत गुन्हेगाराला कायद्याची आणि त्वरित मिळणाऱ्या शिक्षेची भीती वाटत नाही, तोपर्यंत अशा प्रवृत्तींना आळा बसणे कठीण आहे.

सामाजिक मानसिकतेत बिघाड निर्माण झाला आहे.अत्याचाराच्या वाढत्या घटनांमागे केवळ कायद्याची कमतरता नसून, सामाजिक मानसिकतेत झालेला बदलही कारणीभूत आहे.अनेक गोष्टी मुळे माणसाचे मनातील अस्वस्थता वाढली आहे. कदाचित ती अस्वस्थता त्याला विकृतीकडे घेऊन जात असावी. इंटरनेटचा अतिवापर, माध्यमातून विकृत साहित्याची सहज उपलब्धता आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास यामुळे तरुण पिढी भरकटत आहे. वयस्करां मधली वासनांधताही वाढत असल्याचे दिसून येत आहे. स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन जोपर्यंत सन्मानाचा होत नाही, तोपर्यंत घराबाहेरच काय, तर घरातही महिला सुरक्षित राहतील याची खात्री देता येत नाही.

**उपाययोजना काय असाव्यात?**

१. **पोलिस गस्त आणि सीसीटीव्ही** : वर्दळीच्या ठिकाणी आणि शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात पोलिसांची गस्त वाढवणे आवश्यक आहे.

२. **द्रुतगती न्यायालये** (Fast Track Courts) : अशा प्रकरणांचा निकाल लवकर लागावा जेणेकरून समाजात एक कठोर संदेश जाईल.

३. **शालेय शिक्षण** : शालेय स्तरापासूनच मुला-मुलींना 'गुड टच-बॅड टच' आणि नैतिक मूल्यांचे शिक्षण दिले पाहिजे.

४. **सामाजिक बहिष्कार** : गुन्हेगारांना राजकीय किंवा सामाजिक आश्रय न देता, त्यांच्यावर कडक सामाजिक बहिष्कार टाकायला हवा. महाराष्ट्र हे केवळ एक राज्य नसून, तो एक विचार आहे. छ.शिवाजी महाराज, शाहू महाराज-म.फुले-बाबासाहेबआंबेडकर, सावित्रीबाई, गोखले, आगरकर, लो.टिळक, यांचा वैचारिक वारसा असलेल्या राज्यात जर महिला आणि बालके सुरक्षित नसतील, तर प्रगतीचे सर्व आकडे फोल आहेत. केवळ सरकार किंवा पोलिसांना दोष देऊन चालणार नाही, तर प्रत्येक नागरिकाने सतर्क राहून आपल्या परिसरातील अशा प्रवृत्तींना ठेचणे गरजेचे आहे. तरच 'अत्याचाराची ही छाया' दूर होवून उद्याचा महाराष्ट्र सुरक्षित आणि तेजस्वी असेल.



**दिलीप देशपांडे**
**जामनेर. जि.जळगांव**
**मोबा. ८९९९५६६९१७**

## वेगळे वळण

अनुचित घटना घडे
वेगळे लागते वळण
बघ्यांची लोटते गर्दी
फोटो पोस्ट उधळण

असेझाले तसे झाले
दळांया लागा दळण
उंचावूनि पाहे भुवया
भितीआश्चर्ये गाळण

बेताल वक्तव्ये बोला
मनाची करते चाळण
अफवा आग धुमसते
नाठाळ पुरवी जळण

कोलमडू पडे यंत्रणा
व्यवस्था घेई लोळण
अडचणी तपासकार्ये
शिस्तकठीण पाळण

पीडीत धैर्य संयमाचे
करुन टाके उन्मळण
रस भरीत एक वर्णन
तीचं आळव गवळण

प्रसिद्धी फिरतेमुक्तते
राजकारण घोटाळण
करता मदती प्रदर्शन
चाले श्रेया लोटाळण

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# नसरापूर प्रकरणी वेळेत न्याय मिळेल का ?

पुण्यातील नसरापूर येथे एका ४ वर्षाच्या चिमुरडीवर झालेल्या अत्याचाराचे आणि तिच्या हत्येचे प्रकरण आज राज्यभर गाजत आहे. याप्रकरणी भीमराव कांबळे या नराधमाला पोलिसांनी अटक केली असून त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे. या नराधमाच्या हा पहिला गुन्हा नसून यापूर्वीही त्याच्यावर स्त्री अत्याचाराचे आणि विनयभंगाचे अनेक गुन्हे नोंद आहेत. स्वतःच्या भावाच्या अल्पवयीन मुलीवरही त्याने अत्याचार केला आहे.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे या सर्व प्रकरणांत तो जामिनावर मुक्त आहे त्यामुळे या प्रकरणातही पुन्हा तो जामिनावर बाहेर येऊन पुन्हा तशा प्रकारचा गुन्हा करण्यासाठी मुक्त होणार का असा प्रश्न आता सर्वसामान्य जनतेला पडला आहे. आजमितीला राज्यात स्त्रीसुरक्षेचे तीनतेरा वाजले आहेत हे कोणीच नाकारणार नाही. प्रतिदिन राज्यात कुठेनाकुठे बलात्काराच्या, विनयभंगाच्या, लैगिक शोषणाच्या घटना घडत आहेत.

गुन्हेगारांवर कायद्याचा धाक राहिलेला नाही किंवा सध्याचे कायदे हे गुन्हेगारांना योग्य शासन देण्यास अपुरे असल्याचे वेळोवेळी दिसून येत आहे. छत्रपती शिवरायांच्या काळात रांझा पाटीलने परस्त्रीवर अत्याचार केले म्हणून केवळ त्याचा चौरंग करण्याची शिक्षाच दिली नाही, तर भर चौकात त्याला त्या स्थितीत ठेवण्यास सांगितले की, जेणेकरून स्त्रियांवर अत्याचार केल्यास अशा प्रकारची कठोर शिक्षा दिली जाईल, हा धाक जनमानसावर बसेल ! छत्रपती शिवरायांच्या राज्यात कठोर कायदा व्यवस्था असल्याचा संदेश त्यांनी याद्वारे सर्वांना दिला होता. त्यामुळे स्त्रियांवरील अत्याचाराच्या घटना मोठ्या प्रमाणात घडल्याचे इतिहासात नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांचे राज्यच मुळी जलद न्यायदान, गुन्हेगारांच्या मनात धडकी भरवणारी शिक्षा आणि शिक्षेची तात्काळ कार्यवाही यांवर आधारित होते. त्यामुळे खऱ्या अर्थाने रामराज्य नांदत होते आणि कायदा-सुव्यवस्था राखली जात होती.

एव्हढे गंभीर गुन्हे करूनही भीमराव कांबळे उजळ माथ्याने बाहेर फिरत होता. याचाच अर्थ पोलिसांनी पकडूनही तपासातील त्रुटींमुळे किंवा कायदे सक्षम नसल्यामुळे त्याला प्रत्येक वेळी जामीन द्यावा लागला होता. त्याला जर पहिल्याच गुन्ह्यात कठोर शिक्षा मिळाली असती तर पुन्हा अशा प्रकारचे कृत्य करण्याची त्याची हिम्मत झाली नसती. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नसरापूर प्रकरणी स्वतः लक्ष घालून एसआयटीची



स्थापना केली आहे तसेच हा गुन्हा उच्च न्यायालयात चालवून कांबळेला फासावर लटकावण्याचे आश्वासन दिले आहे,

मात्र खरोखर असे घडेल का ? या सर्व चौकशीत पुन्हा किती काळ जाईल ? हा खटला आणखी किती वर्षे चालेल ? गुन्हेगाराने गुन्हा कबुल केला आहे आणि सर्वकाही स्पष्ट असताना न्यायालय शिक्षा देण्यास विलंब का करते ? देशात आतापर्यंत दुर्मिळातील दुर्मिळ असे अनेक गुन्हे घडले आहेत आणि अशा खटल्यांतही न्यायालयाने आरोपींना शिक्षा सुनावण्यात कित्येक वर्षे घेतली आहेत. नसरापूरात वासनेचा बळी गेलेल्या चिमुरडीला न्याय केव्हा मिळणार ?

आज प्रकरण राज्यभर गाजत असले तरी पुढील आठवडा-पंधरा दिवसांनी लोक सर्वकाही विसरून जातील. आज सोशल मीडियावर निषेध व्यक्त करणारे, चिमुरडीला न्याय मिळण्यासाठी आंदोलन करणारे यांचे प्रमाणही हळूहळू कमी होत जाईल. पुढे संघर्ष करायचा आहे तो केवळ मुलीच्या नातेवाईकांना. स्त्री अत्याचाराचा आलेख थांबवायचा असेल तर राज्यकर्त्यांनी केवळ शिवरायांचे नाव घेऊन राजकारण करण्यापेक्षा शिवरायांनी केलेल्या लोकहितकारी कृतींचे अनुकरण करायला हवे. जेणेकरून वासनांधांवर कायमस्वरूपी जरब बसेल. राज्याचे मुख्यमंत्री ते करतील का ?

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## पेण येथे आठव्या जनगणनेबाबत तहसीलदारांची पत्रकार परिषद



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०४, पेण (रायगड) :** देशभरात आठव्या जनगणना प्रक्रियेला सुरुवात झाली असून यंदाची जनगणना पूर्णपणे डिजिटल पद्धतीने पार पडणार आहे, अशी माहिती पेण तहसीलदारांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी त्यांनी सांगितले की, शासनाने नागरिकांसाठी स्वगणना (Self Enumeration) ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या अंतर्गत नागरिकांनी १ मे ते १५ मे दरम्यान अधिकृत संकेतस्थळावर जाऊन स्वतःची व आपल्या कुटुंबातील सदस्यांची माहिती ऑनलाइन भरायची आहे. स्वगणना पूर्ण केल्यानंतर प्रत्येक नागरिकाला एक विशिष्ट रेफरन्स कोड मिळणार आहे. त्यानंतर १५ मे ते १६ जून या कालावधीत नियुक्त प्रगणक नागरिकांच्या घरी भेट देऊन माहितीची पडताळणी करतील. ज्यांनी स्वगणना केली आहे, त्यांनी मिळालेला कोड प्रगणकाला देणे आवश्यक असून त्यामुळे माहितीची पडताळणी जलद आणि अचूक होणार आहे.तहसीलदारांनी पुढे सांगितले की, डिजिटल जनगणनेमुळे प्रक्रिया अधिक सोपी, पारदर्शक आणि वेळेची बचत करणारी ठरणार आहे. तसेच कागदपत्रांचा वापर कमी होऊन पर्यावरणपूरक उपक्रमालाही चालना मिळणार आहे. शासनाकडून सर्व नागरिकांना दिलेल्या वेळेत स्वगणना पूर्ण करून जनगणना प्रक्रियेला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## मनोर येथे आदिवासी कोळी मल्हार समाजाचा भव्य महा मेळावा संपन्न




**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०४, मनोर (पालघर) :** पालघर जिल्ह्यातील मनोर येथे आदिवासी कोळी मल्हार समाजाचा सातवा भव्य महा मेळावा शगुन ग्राउंडवर मोठ्या उत्साहात व जल्लोषात पार पडला. समाजाची समृद्ध परंपरा, संस्कृती, भाषा आणि ओळख जपण्याच्या उद्देशाने आयोजित या मेळाव्याला समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या मेळाव्यास पालघर, डहाणू, वाडा, विक्रमगड, वसई तसेच ठाणे, मुंबई व परिसरातून मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

मेळाव्याला माजी आमदार अविनाश सुतार, बोईसर विधानसभा मतदारसंघाचे आमदार विलास तरे, माजी आमदार राजेश पाटील, माजी सभापती पांडुरंग बेलकर संघटनेचे अध्यक्ष विलास बेलकर, यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावली. तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनीही सहभाग घेतला.

मेळाव्यात कोळी मल्हार समाज मेळाव्याची आवश्यकता, आदिवासी चित्रकला, पारंपरिक चौक, सांस्कृतिक वारसा, पेसा कायदा, तसेच आदिवासी जात पडताळणीतील अडचणी आणि समाजाच्या हक्कांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी शिक्षण, एकता, स्वावलंबन आणि सामाजिक संघटन यावर विशेष भर देण्यात आला. युवकांनी उच्च शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात प्रगती साधावी, शासकीय योजना व आरक्षणाचा लाभ घ्यावा आणि रोजगाराच्या संधींचा योग्य वापर करावा, असे आवाहन मान्यवरांनी केले. मेळाव्यात वैद्यकीय, कायदा, अभियांत्रिकी, क्रीडा आदी क्षेत्रात प्राविण्य मिळवलेल्या गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडवणारी दालने हे या मेळाव्याचे विशेष आकर्षण ठरले. शिस्तबद्ध पद्धतीने पार पडलेल्या या भव्य मेळाव्याने समाजाच्या प्रगतीसाठी नवा दिशादर्शक निर्माण केल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## रोहना येथे बुद्ध जयंती उत्साहात; विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०४, नागपूर :** धम्म मैत्री बुद्ध विहार, रोहना येथे महाकरुणिक गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त बक्षीस वितरण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. नुकत्याच पार पडलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेतलेल्या चिमकल्या विद्यार्थ्यांना बुद्ध जयंतीचे औचित्य साधून पारितोषिके प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात विहारातील उपासक-उपासिकांनी सामूहिक बुद्ध वंदनेने केली. त्यानंतर उपस्थितांच्या हस्ते मान्यवर पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून रोहना येथील सरपंच चंद्रशेखर लांडे, पत्रकार मयूर तिरपुडे, केशव पानतावणे तसेच भीमराव वासनिक, भोजराज उके, प्रवीण मेश्राम, संजय नाईक, बाबाराव मेश्राम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी सरपंच चंद्रशेखर लांडे व प्रमुख पाहुणे मयूर तिरपुडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना शिक्षण, संस्कार व सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमांमधून आपली गुणवत्ता विकसित करावी, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाला अरुण वासनिक, नरेंद्र देशभ्रतार, खुशाल शेंडे, शंकर नारनवरे यांच्यासह परिसरातील बौद्ध उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. यानंतर चिमुकल्या विद्यार्थ्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. मुलांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद हा कार्यक्रमाच्या यशाची साक्ष देणारा ठरला. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन विहाराचे अध्यक्ष मुकेश वासनिक यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी धम्म मैत्री बुद्ध विहारचे अध्यक्ष मुकेश वासनिक, योगेश वासनिक, ज्ञानेश्वर पाटील, सिद्धार्थ वासनिक, संतोष वासनिक, आकाश शेंडे, आकाश निकोसे, मयूर नारनवरे, सोपनिल नाईक, महेंद्र नारनवरे, अविनाश फुलझले, प्रफुल वासनिक तसेच विहारातील महिलांनी विशेष परिश्रम घेतले.

## आंबोली येथे ट्रेलर पलटी; सुदैवाने जीवितहानी टळली

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०४, कासा (पालघर) :** मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर आंबोली (ता.डहाणू) हद्दीत भरधाव ट्रेलर पलटी होऊन अपघात झाल्याची घटना दिनांक ०३ मे २०२६ रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास घडली. या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसून ट्रेलरचे मोठे नुकसान झाले आहे. कासा पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ट्रेलर (क्र.६ ०३ठ ९३२९) चालक कमलेशकुमार रामजी यादव (वय ३४, रा. मुंबई) हा वाहनात माल भरून भरूचच्या दिशेने जात होता. दरम्यान, आंबोली गावाजवळील सर्व्हिस रोडवर येत असताना चालकाने वाहनावरचा ताबा गमावल्याने ट्रेलर पलटी झाला. या घटनेत सुदैवाने कोणालाही दुखापत झाली नाही. मात्र, वाहनाचे मोठे नुकसान झाले आहे. चालकाने वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष करून बेदरकारपणे वाहन चालवल्याचा आरोप असून, त्याच्याविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २८१ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणी कासा पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार संतोष जाधव यांनी फिर्याद दिली आहे. आरोपीस बीएनएसएस कलम ३५ नुसार नोटीस देण्यात आली असून पुढील तपास कासा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अमर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शेंडे करीत आहेत.

# माथेरानमध्ये ही रिक्षा स्टँडवर संताप

## अहिल्याबाई होळकर चौकात स्थलांतराची व्यापाऱ्यांची मागणी

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.०४, माथेरान :** पर्यटन नगरी म्हणून ओळख असलेल्या माथेरान येथे सध्या ई-रिक्षा स्टॅण्डच्या ठिकाणावरून वाद निर्माण झाला असून स्थानिक व्यापारी, लॉजधारक आणि व्यावसायिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे. पर्यावरणपूरक वाहतुकीच्या दृष्टीने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर सुरू करण्यात आलेल्या ई-रिक्षांना तत्त्वतः कोणताही विरोध नसला, तरी त्यांच्या सध्याच्या थांब्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होत असल्याचा आरोप केला जात आहे. गेल्या वर्षभरापासून ई-रिक्षांचा मुख्य थांबा वीर हुतात्मा भाई कोतवाल स्मारक परिसरात निश्चित करण्यात आला आहे. मात्र या निर्णयामुळे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर चौक ते स्मारक दरम्यानचा व्यापारी पट्टा अक्षरशः ओस पडल्याची तक्रार आहे. इंदिरा गांधी नगर, दस्तुरी नाका आणि या मधल्या भागातील हॉटेल, लॉजिंग व्यवसाय तसेच छोटे-मोठे दुकानदार यांना मोठा आर्थिक फटका बसत असल्याचे व्यावसायिक सांगत आहेत.पूर्वी ई-रिक्षा सेवा सुरू होण्यापूर्वी पर्यटक दस्तुरी नाका येथून पायी, घोड्यावर किंवा हात रिक्षाद्वारे शहरात प्रवेश करत असत. त्यामुळे दस्तुरी ते रेल्वे स्टेशन या संपूर्ण पट्ट्यातील व्यवसायांना चांगली चालना मिळत होती.

मात्र सध्या पर्यटक ई-रिक्षा, घोडे किंवा मिनी ट्रेनने थेट बाजारपेठ आणि रेल्वे स्टेशन परिसरात पोहोचत असल्याने मधल्या भागातील व्यावसायिकांकडे पर्यटक फिरकत नसल्याचे चित्र आहे.याच पार्श्वभूमीवर स्थानिक व्यापारी व लॉजिंग असोसिएशनने ई-रिक्षा स्टॅण्ड पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर चौक येथे स्थलांतरित करण्याची मागणी पुढे आणली आहे. त्यांच्या मते, हा परिसर दुतर्फा रस्ता आणि तुलनेने प्रशस्त जागा असल्याने वाहतूक व्यवस्थापन अधिक सुलभ होईल. तसेच या ठिकाणी स्टॅण्ड आल्यास पर्यटकांची वर्दळ वाढून मधल्या भागातील व्यवसाय पुन्हा सुरू होतील.

व्यावसायिक सागर पाटील यांनी सांगितले की, माथेरानमध्ये रिक्षांना आमचा विरोध नाही; मात्र अहिल्याबाई होळकर चौक ते स्मारक या पट्ट्यातील व्यापारी आणि लॉजधारकांवर मोठा अन्याय होत आहे. पर्यटक थेट पुढे जात असल्याने आमचा व्यवसाय ठप्प झाला आहे. स्टॅण्ड चौकात आणल्यास सर्वांनाच फायदा होईल.दरम्यान, काही नागरिकांनीही नियोजनाच्या अभावाकडे लक्ष वेधले आहे.



> इंदिरा गांधी नगर मधेही लोक राहतात त्यांचा ही व्यवसाय पर्यटकांवर अवलंबून आहे. त्यांचीसुद्धा ४/४ दिवस व्यवसायाची भवानी होत नाही. उपासमार होत आहे. त्यांना ही विस्थापित म्हणून रिक्षा दया किंवा इच्छामरणाची परवानगी मिळवून दया.आणि मग ११३ काय ५०० रिक्षाना परवानगी दया.
>
> **- रमाकांत तोरणे (व्यावसायिक, इंदिरा गांधी नगर)**

अरुंद रस्ते, वाढती गर्दी आणि अनियंत्रित थांबे यामुळे वाहतुकीचा ताण वाढत असून, ई-रिक्षा सेवा योग्य पद्धतीने राबवण्याची गरज व्यक्त केली जात आहे. पांडे रोड, इंदिरा गांधी नगर आणि बाजारपेठ परिसरात गरजेनुसार स्वतंत्र थांबे निश्चित करण्याची मागणी ही पुढे येत आहे.या प्रकरणी व्यापारी संघटना, लॉजिंग असोसिएशन आणि इतर संस्थांकडून निवेदन तयार करण्यात आले असून ते रायगड जिल्हाधिकारी, स्थानिक आमदार, नगरपरिषद प्रशासन आणि पोलीस विभागाला सादर केले जाणार आहे. सर्व संबंधित घटकांमध्ये समन्वय साधून शाश्वत आणि सर्वसमावेशक निर्णय घेण्याची मागणी जोर धरत आहे.एकूणच, ई-रिक्षा ही पर्यावरणपूरक आणि आवश्यक सुविधा असली तरी तिच्या अयोग्य नियोजनामुळे स्थानिक व्यवसायांना मोठा फटका बसत असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून संतुलित तोडगा काढणे, हीच सध्याची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे.

## पारधी समाज व गोसावी समाजाला कौटुंबिक साहित्याच्या वाटपाचा भव्य कार्यक्रम संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, सातारा :** श्री संताजी शैक्षणिक व सामाजिक विकास संस्था सातारा महाराष्ट्र या संस्थेमार्फत दिनांक ०३ मे २०२६ रोजी तांबी फाटा, तालुका कोरेगाव जिल्हा सातारा येथे पारधी समाज व गोसावी समाजाच्या लोकांना कौटुंबिक साहित्याच्या वाटपचा कार्यक्रम अत्यंत यशस्वीरित्या पूर्ण झाला. निस्पृह व निस्वार्थ भावनेने एखादा सामाजिक कार्यक्रम केल्यानंतर त्या कार्यक्रमाला किती उत्कृष्ट पद्धतीने यश मिळते, समाजाचा प्रतिसाद मिळतो. याचे हे अत्यंत उत्तम उदाहरण म्हणून आजच्या कार्यक्रमाची नोंद करण्यात येईल. या कार्यक्रमांमध्ये पारधी समाजाचे व गोसावी समाजाचे लाभधारक फार मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांची उपस्थितीत आज समाजामध्ये अशा कार्यक्रमांची किती नितांत गरज आहे, हे दर्शवत होते.



पारधी समाज डोंगराच्या पायथ्याला, ओसाड माळावरती, गावाच्या बाहेर झोपड्या टाकून आपला उदरनिर्वाह करत असतात. सर्व सामान्य माणसाचा या समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अत्यंत वेगळ्या प्रकारचा आहे. त्यामुळे सर्वसामान्य माणूस या समाजापासून दूर व थोडा भीतीयुक्त पद्धतीने राहत असतो. हा समाज आतापर्यंत शिक्षणाच्या दृष्टीने अत्यंत मागास तर होताच परंतु उदरनिर्वाचेही काही साधन नसल्याने अत्यंत कठीण पद्धतीने जीवन कंठत असलेला दिसतो. यासोबतच गोसावी समाज ही आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेला समाज असल्याने या समाजालाही खऱ्या अर्थाने मदतीची गरज असल्याचे दिसून येते. या ठिकाणी या दोन्ही समाजाची सर्वसाधारण माहिती घेतल्यानंतर संघटनेने असे ठरवले की या वस्ती वरती या समाजाला मदत करणे नीतांत गरजचे आहे व त्याप्रमाणे निर्णय घेऊन मदतीचा कार्यक्रम ठरविण्यात आला.

या कार्यक्रमांमध्ये पारधी समाजामधील एका तरुण महिलेने आपले मनोगत व्यक्त करताना अत्यंत हृदयाला स्पर्श करून जातील अशा शब्दांमध्ये आपल्या भावना व्यक्त केल्या. आमचा समाज आर्थिक व सामाजिक दृष्ट्या मागास आहे. आमच्याकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन ही वेगळ्या प्रकारचा आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने जो सुधारित समाज आहे त्यांनी आम्हाला मदत करावी किंवा आम्हाला मार्गदर्शन करावे, आपले आशीर्वाद द्यावेत असे अपेक्षित आहे. आज आपण सर्वजण या ठिकाणी येऊन आम्हाला जी मदत करत आहात त्यासाठी आम्ही सर्व समाजातर्फे आपले मनःपूर्वक धन्यवाद व्यक्त करतो. माझी मुलगी ही आश्रम शाळा बामनोली येथे शिकत असून तिलाही आपल्यासारख्या दानशूर बांधवांच्या मदतीमुळे शिक्षणामध्ये फार मदत मिळत आहे. त्या मुलीची शैक्षणिक प्रगती पाहता त्या मुलीलाही उत्स्फूर्तपणे श्री संताजी शैक्षणिक व सामाजिक विकास संस्था सातारा महाराष्ट्राच्या पदाधिकाऱ्यांनी भरघोस आर्थिक मदत केली.

आजच्या या कार्यक्रमांमध्ये ५५ लाभार्थ्यांनी कौटुंबिक साहित्य स्वीकारण्याचा लाभ घेतला. उपस्थित लाभार्थ्यांची संख्या पाहता कार्यक्रम अत्यंत यशस्वी झाला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अर्जुन लोखंडे व लोखंडे, श्रीयुत मारुती दळवी यांनी अत्यंत सकारात्मक प्रतिसाद देऊन कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मदत केली. श्री अर्जुनराव लोखंडे यांनी स्वतः च्या घरामध्ये या कार्यक्रमासाठी जागा दिली. बैठकीची व्यवस्था केली आणि सर्व लाभार्थींना नाष्टा व इतर सर्व सोयी उपलब्ध करून दिली. या सहकार्यासाठी संघटनेमार्फत त्यांचे मनःपूर्वक आभार.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने संघटनेच्या महिला अध्यक्ष सुरेख आडके म्हणायला आम्ही समाजातील असे सामाजिक मागास व आर्थिक मागास घटक पाहत असतो व त्यांना दरवर्षी अशा प्रकारे कौटुंबिक साहित्याची मदत करत असतो. आज आम्ही आपल्यामध्ये येऊन आपणाला आम्हाला शक्य आहे त्याप्रमाणे आपली मदत करत आहोत. ही सर्व मदत श्री संताजी शैक्षणिक व सामाजिक विकास संस्थेचे सर्व पदाधिकारी स्वतः च्या खिशातून करत असतात. यासाठी कोणताही संस्थेचा पैसा वापरत नाहीत आम्हाला आपणाला मदत करताना नेहमीच आनंद वाटत असतो.

या संस्थेचे अध्यक्ष राम पडगे यांनी या सर्वांना संबोधित करताना म्हणाले की, आज आपल्या सर्वांच्या मध्ये सहभागी होण्याचा आम्हाला जी संधी मिळत आहे. यासाठी निश्चितच आम्ही कुठल्यातरी पूर्वजन्मी काहीतरी पुण्य केलेले असावे. आपल्या सर्वांच्या सोबत राहुल आम्हाला जो आनंद मिळत आहे तो निश्चितच अतिशय अनमोल आहे. माणसाने माणसावर प्रेम करावे माणसाने माणसासाठी जगावे याला अनुसरून आम्हाला जेवढे शक्य होईल त्याप्रमाणे आम्ही आपणाला मदत करत आहोत. संघटना दरवर्षी एका आर्थिक व सामाजिक दुर्बल घटकाची निवड करून त्यांना अशा प्रकारे साहित्य वाटप असते.

संघटनेने आतापर्यंत अत्यंत उत्कृष्ट प्रगती केली असून संघटना आज ८० जी मान्यता प्राप्त, एनजीओ मान्यता प्राप्त व भारत सरकारचे सीएसआर वन प्रमाणपत्र प्राप्त अशी संस्था असून याचा आम्हा सर्वांना अभिमान आहे. हे सर्व मिळवण्यासाठी अत्यंत पारदर्शक व्यवहार व निस्वार्थ भावनेने काम करणारे सहकारी असावे लागतात. मी याबाबतीत अत्यंत भाग्यवान आहे की मला असे सर्व सहकारी मिळालेले आहेत मी त्या सर्वांचे निश्चितच या निमित्ताने धन्यवाद व्यक्त करतो .आज या कार्यक्रमासाठी वयाच्या ८५ व्या वर्षी दयारामजी हाडके उपस्थित आहेत. आमच्या संघटनेचे उपाध्यक्ष माननीय विठ्ठलराव शिरसागर वयाच्या ८० व्या वर्षी धडपडत आहेत. आमच्या संघटनेचे जिल्हा समन्वयक पोपटराव भोज आज वयाच्या ७५ नंतर काम करत आहे असे अनेक समाजाला वाहून घेणारे लोक माझ्यासोबत असलेले असे चांगले काम करण्याची संधी आम्हाला प्राप्त होत आहे. आपण सर्वांनी यामध्ये सहभाग घेतला व आम्ही दिलेली मदत आपण प्रेमाने स्वीकारत आहात. यासाठी मी आपले सर्वांचे धन्यवाद व्यक्त करतो. आजचा हा कार्यक्रम आमच्या संघटनेच्या महिला अध्यक्ष सुरेखा हाडके व जिल्हा समन्वयक पोपटराव भोज व भोज यांच्या मदतीने होत आहे याची ही नोंद संघटनेने घेतली असून संघटना त्यांचे ही धन्यवाद व्यक्त करते.

आजच्या या कार्यक्रमासाठी संघटनेचे अध्यक्ष राम पडघे उपाध्यक्ष विठ्ठलराव शिरसागर सचिव नामदेवराव झगडे जिल्हा महिला अध्यक्ष सुरेखा हाडके, जिल्हा समन्वय पोपटराव भोज, तालुका समन्वय शिवाजीराव गंधाले, जावली तालुकाध्यक्ष राजेंद्र किर्वे, माण तालुका अध्यक्ष शिवदास किरवे, फलटण तालुका अध्यक्ष अमोल राऊत, सातारा तालुका अध्यक्ष अनिल किरवे, जावली तालुका महिला अध्यक्ष अश्विनी किरवे, तेली समाजाचे ज्येष्ठ समाजसेवक व संघटनेचे मार्गदर्शक दयारामजी हाडके प्रदीप देशमाने, मारुती शिरसागर राजेंद्र हाडके, राऊत श्रीयुत युवराज खेडकर, बबन किरवे, अरुण किरवे, विलास किरवे याशिवाय लोखंडे परिवार व या परिसरातील समाज बांधव उपस्थित होते.

# महाराष्ट्र दिनी तामिळनाडूतील जिंजी किल्ल्यावर 'आपला मावळा' ची मोहीम

## गडसंवर्धन, स्वच्छता आणि सांस्कृतिक परंपरेचा संगम



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, अहिल्यानगर :** महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत तामिळनाडूतील ऐतिहासिक जिंजी किल्ला येथे 'आपला मावळा' संघटनेने गडसंवर्धन, स्वच्छता मोहीम उत्साहात राबवली. खासदार नीलेश लंके लंके यांच्या पुढाकारातून सुरू झालेल्या या उपक्रमाचा हा १४ वा टप्पा ठरला. महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या शिवप्रेमी मावळ्यांनी इतिहास जतनाच्या कार्यात आपला वाटा उचलला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याशी ऐतिहासिक नाळ जुळलेला जिंजी किल्ला हा दक्षिण भारतातील अत्यंत महत्त्वाचा दुर्ग मानला जातो. छत्रपती राजाराम महाराजांच्या संघर्षकाळात या किल्ल्याने तात्पुरत्या राजधानीचे स्वरूप धारण करत स्वराज्य टिकविण्यात मोलाची भूमिका बजावली होती. या पार्श्वभूमीवर जिंजी गडावर गडसंवर्धनाची मोहीम राबवण्यात आली.

मोहिमेदरम्यान गड परिसरात स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला. प्लास्टिक कचरा गोळा करणे, झाडाझुडपांची छाटणी व साफसफाई, ऐतिहासिक वास्तूंच्या परिसराची स्वच्छता, गडाच्या मूळ रचनेला हानी पोहोचवणारे घटक दूर करणे अशा विविध कामांमध्ये स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

### गडकोट जपणे हीच खरी देशसेवा

यावेळी बोलताना खासदार निलेश लंके म्हणाले, गडकोट जपणे म्हणजे आपल्या इतिहासाचा आणि स्वाभिमानाचा सन्मान करणे होय. महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता राज्यभरातील ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. जिंजी किल्ल्यावर महाराष्ट्र दिनी साजरा करताना स्वराज्याच्या स्मृतींना अभिवादन करण्याची संधी मिळाली,ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे.

**- खासदार- निलेश लंके**

यात्रसंगी उद्योजक बळवंतराव जगदाळे, पी. एम. जी. भास्कर, उद्योजक श्री.साळुंखे, पांडुरंग सुर्वे, शाहीर विजय तळेकर, आपला मावळाचे अध्यक्ष रामेश्वर निमसे, प्रा.सीताराम काकडे, मोईन काश्मिरी, योगिराज गाडे, सुधीर लकुडझोडे, निखिल निंबाळकर आदीं उपस्थिती होते.

**शिवगर्जनेने दुमदुमला गड**

महाराष्ट्र दिन जिंजी गडावर साजरा करण्याचा संकल्प पूर्णत्वास गेला. भगव्या झेंड्यांच्या साक्षीने आणि जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी गड परिसर दुमदुमून गेला. राज्याच्या सीमांपलीकडे जाऊन महाराष्ट्र दिन साजरा करण्याचा उपक्रम उपस्थितांसाठी अत्यंत अभिमानाचा आणि प्रेरणादायी क्षण ठरला.

**सांस्कृतिक कार्यक्रमांनी रंगला सोहळा...**

जिंजी किल्ल्याच्या पायथ्याशी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. मल्लखांबाचे थरारक प्रात्यक्षिक, भरतनाट्यमचे सादरीकरण तसेच शिवपोवाड्यांच्या जोशपूर्ण गजरात वातावरण भारावून गेले. महाराष्ट्र आणि तामिळनाडू यांच्या सांस्कृतिक परंपरांचा संगम घडवत राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश कार्यक्रमातून देण्यात आला.

**प्रवासादरम्यान जंगी स्वागत**

अहिल्यानगर ते जिंजी या प्रदिर्घ प्रवासादरम्यान विविध ठिकाणी मावळ्यांचे स्वागत करण्यात आले. करमाळा, सोलापूर, विजापूर, बेंगलोर तसेच जिंजी येथे स्थानिक मित्र परिवाराने खासदार निलेश लंके व मावळ्यांचे स्वागत केले. स्वयंसेवकांसाठी भोजन व नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली होती. या सेवाभावामुळे मोहिमेला आपुलकीचा आणि एकात्मतेचा भावनिक स्पर्श लाभला.

# मीरा बोरवणकर यांची राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी निवड

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०४, ठाणे :** आपल्या धडाकेबाज कार्यशैलीमुळे 'लेडी सुपरकॉप' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या निवृत्त पोलीस अधिकारी मीरा बोरवणकर यांची महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही नियुक्ती केली.

काही वादग्रस्त प्रकरणामुळे माजी अध्यक्ष रूपाली चाकणकर यांना नुकताच पदाचा राजीनामा द्यावा लागला होता. त्यांच्या राजीनाम्यानंतर रिक्त झालेल्या या महत्त्वाच्या पदावर कोणाची नियुक्ती होणार याबाबत चर्चा सुरू होती. अखेर आयपीएस अधिकारी मीरा बोरवणकर यांच्या निवडीने त्या सर्व चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे.

प्रशासकीय आणि पोलीस दलातील प्रदीर्घ अनुभव

मीरा बोरवणकर या भारतीय पोलीस सेवेतील अत्यंत वरिष्ठ आणि अनुभवी अधिकारी आहेत. १९८१ च्या बॅचच्या अधिकारी असलेल्या बोरवणकर यांनी महाराष्ट्र केडरच्या पहिल्या महिला आयपीएस अधिकारी होण्याचा मान पटकावला होता.



त्यांच्या पोलीस दलातील कारकिर्दीत त्यांनी पुणे पोलिस आयुक्त, गुन्हे अन्वेषण विभाग (CID) प्रमुख, कारागृह महानिरीक्षक अशी महत्त्वाची पदे भूषवली. तेलगी स्टॅम्प घोटाळा, जळगाव सेक्स स्कँडल यांसारख्या गाजलेल्या प्रकरणांचा छडा लावून त्यांनी गुन्हेगारांवर वचक निर्माण केला होता.

पोलीस दलातील विविध उच्च पदे भूषवल्यानंतर आता त्यांच्याकडे राज्य महिला आयोगाची महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. महिलांचे हक्क, संरक्षण आणि सक्षमीकरण या क्षेत्रांत त्यांच्या निवडीमुळे मोठी सकारात्मक भर पडेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यांच्या या नियुक्तीचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.

# एक दिवस गावासाठी : शिराढोणमधून सुरू झालेली स्वच्छतेची क्रांती आता महाराष्ट्रभर पोहोचणार

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.०४, धाराशिव :** कळंब तालुक्यातील शिराढोण येथे ०३ मे रोजी सामाजिक जबाबदारीचे एक प्रेरणादायी पाऊल उचलत कै. अहिल्याबाई अंबाजी पवार बहुउद्देशीय सामाजिक संस्था, शिराढोण (अअझडड) यांच्या वतीने एक दिवस गावासाठी हा अभिनव उपक्रम प्रथमच राबविण्यात आला. गावाच्या विकासासाठी आणि स्वच्छतेच्या संस्कारासाठी उभा राहिलेला हा उपक्रम शिराढोणच्या इतिहासात नवे पर्व ठरणार असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

या मोहिमेची सुरुवात ग्रामपंचायत प्रांगण स्वच्छ करून करण्यात आली. संस्थेचे सर्व पदाधिकारी, सभासद आणि कार्यकर्ते यांनी श्रमदान करत परिसराची स्वच्छता केली. स्वच्छता ही केवळ मोहीम नसून ती समाजाच्या प्रगतीची पहिली पायरी आहे, हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देण्यात आला.

वर्षानुवर्षे दुर्लक्षित राहिलेल्या रस्त्यांपासून सार्वजनिक ठिकाणांपर्यंत कायमस्वरूपी स्वच्छता राखण्याचा संस्थेचा



मानस असून, ही मोहीम केवळ एका दिवसापुरती मर्यादित न राहता प्रत्येक रविवारी सातत्याने राबविण्यात येणार आहे. पुढील रविवारी गावातील एका धार्मिक स्थळाची निवड करून तेथेही श्रमदानातून स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती पदाधिकाऱ्यांनी दिली.

यावेळी गावातील नागरिकांना आवाहन करण्यात आले की, एक दिवस गावासाठी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून आपले गाव स्वच्छ, सुंदर आणि आदर्श बनविण्यासाठी पुढाकार घ्यावा. कारण आज आपण जी संस्कृती उभी करतो, त्याच पायावर पुढील पिढीचा अभिमान उभा राहतो.

पहिल्या दिवशी नागरिकांचा सहभाग अपेक्षेपेक्षा कमी प्रमाणात दिसून आला असला, तरी संस्थेच्या कार्यकर्त्यांचा निर्धार डगमगलेला नाही. उलट, छोट्या ठिणगीपासून मोठी ज्योत पेटते, यावर विश्वास ठेवत त्यांनी भविष्यात या उपक्रमाला लोकचळवळीचे स्वरूप देण्याचा संकल्प व्यक्त केला. प्रशासकीय स्थळे, धार्मिक स्थळे आणि सामाजिक जनहिताच्या सोयी-सुविधांसाठी संस्था कायमस्वरूपी कार्यरत राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. यासोबतच हा उपक्रम पूर्ण महाराष्ट्रभर राबवण्याचा निर्धार संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी जाहीर केला.

गाव बदलायचे असेल तर विचार बदलावा लागतो, आणि विचार बदलायचा असेल तर कृती करावी लागते.

शिराढोणमधून सुरू झालेली ही कृती आता सामाजिक परिवर्तनाची दिशा ठरू शकते.

एक दिवस गावासाठी ही केवळ मोहीम नाही, तर गाव, समाज आणि महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी उभी राहिलेली जनचळवळ आहे. आजची सुरुवात उद्याच्या इतिहासाची नोंद ठरू शकते.

# अट्टल घरफोड्या जेरबंद, १७.७८ लाखांचा मुद्देमाल जप्त ; चंद्रपूर एलसीबीची कारवाई

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०४, चंद्रपूर :** चंद्रपूर येथील स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) अट्टल घरफोड्या करणाऱ्या आरोपीला अटक करत तीन घरफोडीच्या गुन्ह्यांचा उलगडा केला आहे. या कारवाईत आरोपीकडून सोने-चांदीच्या दागिन्यांसह मोटारसायकल व मोबाईल असा एकूण १७ लाख ७८ हजार २२६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस स्टेशन मुल येथे गुन्हा क्रमांक ३९३/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३३१ (३), ३३१ (४) व ३०५ अंतर्गत दाखल गुन्ह्याच्या तपासादरम्यान स्थानिक गुन्हे शाखेला आरोपीबाबत गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने अमोल इलमकर (रा. दुर्गापूर) यास ताब्यात घेऊन तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे सखोल चौकशी केली. चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली.



या प्रकरणात आरोपीकडून चोरीस गेलेले १०५ ग्रॅम सोन्याचे दागिने पंचासमक्ष जप्त करण्यात आले. तसेच, पोलीस स्टेशन घुग्गुस येथे दाखल गुन्हा क्रमांक १४८/२०२६ अन्वये चोरीस गेलेल्या चांदीच्या दागिन्यांपासून तयार केलेली सुमारे १ किलो ४११ ग्रॅम वजनाची चांदीची लगड आरोपीच्या सांगण्यानुसार एका महिलेकडून जप्त करण्यात आली. याशिवाय, पोलीस स्टेशन मुल येथे मंदिरात झालेल्या चोरीप्रकरणी दाखल गुन्हा क्रमांक ३३२/२०२६ हाही आरोपीनेच केल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपीकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेली यामाहा आर-१ मोटारसायकल तसेच मोबाईल फोनही जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे एकूण तीन घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले असून, परिसरातील गुन्हेगारीवर आळा बसण्यास मदत होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी व अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या पथकात सहायक पोलीस निरीक्षक बलराम झाडोकार, उपनिरीक्षक संतोष निंभोरकर, सर्वेश बेलसरे, सुनील गौरकार यांच्यासह इतर अधिकारी व अंमलदारांचा समावेश होता. सायबर पोलीस स्टेशन चंद्रपूरचेही सहकार्य लाभले. आरोपीस पुढील तपासासाठी पोलीस स्टेशन मुल यांच्या ताब्यात देण्यात आले असून, अधिक तपास सुरू आहे.

# थोडक्यात

## बोरी एसबीआय एटीएम पाच दिवसांपासून बंद; नागरिक त्रस्त




**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०४, बोरी (जिंतूर) :** जिंतूर तालुक्यातील बोरी येथील स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) बँकेच्या एटीएममध्ये गेल्या पाच दिवसांपासून कॅश उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. बोरी हे तालुक्यातील मोठे गाव असून परिसरातील अनेक गावांतील ग्राहक या एटीएमवर अवलंबून आहेत. मात्र सलग पाच दिवस एटीएम बंद असल्याने शेतकरी, कामगार, व्यापारी तसेच ज्येष्ठ नागरिकांना पैसे काढण्यासाठी इतर गावांकडे जावे लागत आहे.

त्यामुळे वेळ आणि अतिरिक्त खर्च वाढत असून नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.एटीएम सुरू ठेवण्यासाठी नियमित कॅश भरणे आवश्यक असताना बँक प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, अशी तक्रार स्थानिकांनी केली आहे. तातडीने एटीएममध्ये कॅश उपलब्ध करून सेवा सुरळीत करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेसाठी मंद्रूपच्या खेळाडूंचे निवड



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, सोलापूर :** १३ वी स्टूडन्ट ऑलिम्पिक असोसिएशनच्या यांच्या संयुक्त विद्यमाने राजीव गांधी इंडोर स्टेडियम सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने स्टुडन्ट ऑलिम्पिक असोसिएशन सोलापूर राज्यस्तरीय

तायक्कांदो स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत दक्षिण सोलापूर तायक्कांदो अकॅडमी मंद्रूपच्या खेळाडूंनी विविध वजनी गटात यश संपादन केले आहे.

पौर्णिमा खंदारे, साक्षी खंदारे, प्रतीक्षा देठे, आरोही रणखांबे, शुक्रना नदाफ, प्रतीक्षा देविदास, अन्वी पवार,सफीना शेख, श्रावणी नंदुरे, स्वाती कट्टीमनी,आरोही भागवत, श्रेया पवार, स्वप्नाली पवार,संग्राम नवले, प्रेम चव्हाण,अभिजीत खरात, अबूबकर नदाफ, समर्थ चव्हाण, कार्तिक परांडे,हर्ष सरवदे, रविराज कुसुरे

यांनी सुवर्णपदक पटकावले व तनुजा सरवदे, दीक्षा हेळकर, आरोही खंदारे, आरोही कंदले, सोहम स्वामी,याने रौप्य पदक मिळविले. यश संपादन केलेल्या

खेळाडूंना दक्षिण सोलापूर तायक्कांडो अकॅडमी मुख्य प्रशिक्षक शिवराज मुगळे व यश खंदारे यांचे मार्गदर्शन लाभले. विजयी खेळाडूंची २७ते २९ जुलै उत्तराखंड हरिद्वार येथे होणाऱ्या राष्ट्रीय

तायक्कांदो स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. निवड झालेल्या सर्व खेळाडूंचे मंद्रूप पंचायत समिती सदस्य मळसिध्द मुगळे, तायक्कांडो अकॅडमीचे अध्यक्ष प्रवीण जोड मोठे यांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## मंथन राज्यस्तरीय सामान्य स्पर्धा परिक्षेत जोंधळे इंटरनॅशनल शाळेचे सुयश...

**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.०४, शहापूर (ठाणे) :** राज्य स्तरीय लक्षवेधी प्रज्ञाशोध, मंथन प्रज्ञाशोध परिक्षेचा निकाल नुकताच लागला या परिक्षेत शहापूर तालुक्यातील अमेय साबळे याने १५० पैकी १३४ गुण मिळवले तर आसनगाव येथील कै. शिवाजीराव जोंधळे इंटरनॅशनल शाळेच्या प्रिशा शिंपी हिने १५० पैकी १२२ गुण मिळवून 'ए' श्रेणी मिळवत राज्यात १५ तर जिल्ह्यात १० आणि सेंटर मधे दुसरा क्रमांक मिळविला. जोंधळे इंटरनॅशनल शाळेचाच स्वराज तुषार बडगुजर याने १५० पैकी ११८ गुण मिळवत राज्यात १७ जिल्ह्यात १२ वा आणि शाळेत ४ था क्रमांक मिळविला. शाळेचे तीन विद्यार्थी सेंटर लेव्हल प्राईज विनर ठरले. शाळेतील एकुण १६ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. शाळेतील शिक्षक, शिक्षिका, पालक यांच्या मार्गदर्शनाखाली या विद्यार्थ्यांनी यश मिळवले. शहापूर सारख्या अदिवासी बहुल भागातील या विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## पाथरी नगराध्यक्ष आसेफ खान यांची जिंतूर नगरपालिकेला सदिच्छा भेट...




**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०४, जिंतूर :** पाथरी नगरपालिकेचे नगराध्यक्ष तथा शिंदे गटाचे प्रमुख नेते आसेफ खान यांनी जिंतूर नगरपालिकेला सदिच्छा भेट देत स्थानिक विकासकामांचा आढावा घेतला. त्यांच्या आगमनावेळी जिंतूर शहरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. जिंतूर नगरपालिकेचे भाजप पक्षाचे नगराध्यक्ष प्रतापराव देशमुख यांनी आसेफ खान यांचे हार, शाल व पुष्पगुच्छ देऊन मनापासून स्वागत व सत्कार केला. या प्रसंगी नगरपालिकेच्या प्रांगणात मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. यावेळी उपनगराध्यक्ष टीका खान पठाण, नगरसेवक शेख अथर, नगरसेवक करीम लाला, जब्बार खान, मोहसीन खान यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. भेटीदरम्यान जिंतूर शहरातील सुरू असलेल्या विकासकामांबाबत, नागरिकांच्या मूलभूत सुविधा, तसेच भविष्यातील नियोजन यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.आसेफ खान यांनी जिंतूर शहराच्या विकासासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याची भूमिका व्यक्त केली. तर नगराध्यक्ष प्रतापराव देशमुख यांनीही परस्पर समन्वयातून शहराचा सर्वांगीण विकास साधण्याचा निर्धार व्यक्त केला. या सदिच्छा भेटीमुळे दोन्ही नगरपालिकांमधील संबंध अधिक दृढ होण्यास मदत होणार असून, भविष्यात विविध विकास प्रकल्पांना चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.